क्रमांक :- ९९

महाराष्ट्र विधानपरिषद

पत्रक भाग दोन

गुरुवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०२६ / कार्तिक २८, १९४८ (शके)

१०६ सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२६ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाकरीता सर्वसाधारण व प्रश्नातून उद्भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना सोमवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२६ रोजीपासून कार्यालयीन वेळेत **QIS** या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन (**Online**) पध्दतीने स्वीकारण्यात येतील. स्वीकृत अर्धा-तास चर्चेच्या सूचनांचे बॅलटकरीता खाली दर्शविल्याप्रमाणे दिवस निश्चित करण्यात आले आहेत. सदर बॅलट विधान भवन, नागपूर येथील कार्यालयात **श्रीमती पुष्पा दळवी, उप सचिव** व **श्री.नितीन आहेर, अवर सचिव(स.) यांच्या दालनात** घेण्यात येईल. उक्त बॅलटचा तपशील खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आला असून त्यामध्ये बॅलटचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (१) मध्ये, अर्धा-तास चर्चेचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (२) मध्ये, बॅलटची वेळ विवरणपत्राच्या स्तंभ (३) मध्ये व बॅलट घेणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविण्यात आले आहे.

बॅलटचा दिनांक (१)	**अर्धा-तास चर्चेचा दिनांक** (२)	**वेळ** (३)	**अधिकाऱ्यांचे नाव** (४)
सोमवार, दि. ७ डिसेंबर, २०२६	मंगळवार, दि. ८ डिसेंबर,२०२६	सकाळी ११.०० वा.	श्रीमती पुष्पा दळवी उप सचिव
मंगळवार, दि. ८ डिसेंबर,२०२६	बुधवार, दि. ९ डिसेंबर,२०२६	सकाळी १०.३० वा.	श्री.नितिन आहेर अवर सचिव (स.)
बुधवार, दि. ९ डिसेंबर ,२०२६	गुरुवार, दि. १० डिसेंबर,२०२६	सकाळी १०.३० वा.	श्रीमती पुष्पा दळवी उप सचिव
शुक्रवार , दि. ११ डिसेंबर,२०२६	सोमवार, दि. १४ डिसेंबर,२०२६	सकाळी १०.३० वा.	श्री.नितीन आहेर अवर सचिव (स.)
सोमवार, दि. १४ डिसेंबर,२०२६	मंगळवार, दि. १५ डिसेंबर,२०२६	सकाळी १०.३० वा.	श्रीमती पुष्पा दळवी उप सचिव
मंगळवार, दि. १५ डिसेंबर,२०२६	बुधवार, दि. १६ डिसेंबर,२०२६	सकाळी १०.३० वा.	श्री.नितिन आहेर अवर सचिव (स.)
बुधवार, दि. १६ डिसेंबर,२०२६	गुरुवार, दि. १७ डिसेंबर,२०२६	सकाळी १०.३० वा.	श्रीमती पुष्पा दळवी उप सचिव

२/-

सर्वसाधारण व प्रश्नातून उद्भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना QIS या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील. याची कृपया नोंद घ्यावी.

विधान भवन,
मुंबई/ नागपूर
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०२६

डॉ.विलास आठवले
सचिव - ३
महाराष्ट्र विधानपरिषद

याची प्रत :-

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा.सदस्य.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालये.
४) संगणक कक्ष (Website).
५) MKCL कक्ष.